


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २७४, गुरुवार १८ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# तुम्ही भाजपाचे ! तुमचेच सरकार !! तुमचाच अविश्वास !!!

■ तुम्ही कोणाशीही प्रामाणिक नाहीत ■ फेरमतमोजणीच्या मागणीवर खा. लंके यांचा डॉ. विखेंवर हल्लाबोल ■ फेरमोजणीत काही निष्पन्न होणार नाही ■ नीलेश लंके यांचा विश्वास

हंगा : विशेष प्रतिनिधी

**ईव्हीएम मशिनबाबत वास्तविक आमच्यासारख्याने तक्रार करायला हवी होती. तुम्ही भाजपाचे, देशात तुमचे सरकार आणि तुम्हीच यंत्रणेवर अविश्वास दाखवत असाल तर याचा अर्थ असा होतो की तुम्ही कोणाशीच प्रामाणिक नाहीत असे सांगत खा. नीलेश लंके यांनी भाजपाचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या फेरमतमोजणीच्या मागणीवर माध्यमांजवळ प्रतिक्रीया देताना विखे यांचे नाव न घेता हल्लाबोल केला.**



विशिष्ठ मतदान केंद्रांवरील मतांची फेरमतमोजणी करण्यासाठी भाजपाचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी निवडणूक आयोगाकडे मागणी केली होती. त्यावर मॉक पोल घेण्यात येणार असल्याबाबत माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना खा. लंके यांनी हंगे येथे बोलताना बेधडक उत्तरे दिली.

खा. लंके म्हणाले, जरी मॉक पोल झाला तरी माझा निवडणूक आयोगावर व त्या यंत्रणेवर माझा शंभर टक्के विश्वास आहे. या यंत्रणेमध्ये फेरफार, बदल होत नसतो. लोकसभेची निवडणूक ही देशाचे भवितव्य घडविणारी निवडणूक आहे. उद्या जर या यंत्रणा, मशिन मॅनेज होत असत्या तर लोकांनी रात्रंदिवस समाजासाठी काम केलेच नसते असे लंके म्हणाले.

### कर्तुत्वगुणामुळे मशिनवर ठपका !

फेरमतमोजणीचा हा निकाल देशात जाणार आहे. त्यात काही गडबड आढळल्यास विरोधी पक्षांकडून ईव्हीएममध्ये गडबड होते या आरोप खरा ठरला जाईल हे माध्यम प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिल्यानंतर लंके म्हणाले, माझ्या मतदासंघातील ज्या ४० मतदान केंद्रांची फेरमतमोजणी करण्यात येणार आहे, त्यात एक मताचाही फरक पडणार नाही. आता समाजापुढे जायचे तर कसे जायचे ? समाजाला हे सांगू शकत नाही की आम्ही आमच्या कर्तुत्व गुणामुळे पराभूत झालो. त्यासाठी मशिनमध्ये गडबड आहे, मशिन मॅनेज केल्या आहेत हे सांगतले जाते. अशा गोष्टींकडे फार लक्ष न देता आपण काम करीत राहणे ही आपली भूमिका असल्याचे लंके यांनी सांगितले.

### फेरमतमोजणीची मागणी म्हणजे रडीचा डाव !

निवडणूकीच्या काळात यंत्रणा मॅनेज करायची आणि निवडणूकीला सामोरे जायचे असे त्यांचे काम आहे. आता फेरमतमोणीची मागणी म्हणजे रडीचा डाव आहे. आपलं अपयश, आपलं काळं तोंड समाजापुढे कसे दाखवायचे ? यासाठी हा बालीशपणा सुरू आहे. त्यात काही होणार नाही असे लंके यांनी ठामपणे सांगितले.

### एकाही केंद्रावर गडबड आढळणार नाही

एकाही मतदान केंद्रावर काहीही गडबड आढळणार नाही. निवडणूक आयोगाची ही यंत्रणा आहे. प्रत्येक मशिन मतदान केंद्रावर गेल्यानंतर त्याची तपासणी केली जाते. मॉक पोल घेतला जातो त्यानंतर ते मतदान मोजले जाते व त्यानंतरच प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया सुरू करण्यात येते असे लंके म्हणाले.

### काही होणारच नाही मग चर्चा कशाला ?

माझ्या मतदारसंघात मी सर्व बारकाईने पाहिलेले आहे. त्याचा आम्ही अभ्यास केलेला आहे. त्यामुळे कोठेही हेराफेरी होणार नाही. काही होणार नाही तर त्यावर चर्चा कशाला करायची ? असा सवाल लंके यांनी केला.

### त्यांना पाच वर्षे तेवढेच काम दिले आहे

त्यांना आता काही कामच राहिले नाही, अर्ज करा, अजूनही निवडणूक आयोगाकडे काही तक्रारी करा हे सगळे उद्योग ते आता करतील. त्यांना काय करायचे ते करू द्या. त्यांना पाच वर्षे आपण तेवढेच काम दिले आहे. त्या पध्दतीने ते त्यांचे काम करतील असा टोला लंके यांनी लगावला.

### त्यांच्या आजोबांनीही तेच केले !

१९९१ ची पुनरावृत्ती होऊ शकते का ? या प्रश्नावर बोलताना १९९१ मध्ये त्यांच्या आजोबांनी हेच केले. त्यांच्या कुटूंबाची ही परंपरा आहे. त्याच चालीवर जाण्याची काही कुटूंबाची एक खासीयत असते असे सांगत खा. लंके यांनी विखे परिवारावर टिकाश्र सोडले.

निळा म्हणे पिंपळनेर, दूजे केले पंढरपूर

# प्रतिपंढरी पिंपळनेरमध्ये भाविकांची मांदियाळी !

■ आषाढी एकादशीनिमित्त निळोबारायांच्या दर्शनाला लोटला जनसागर ■ स्थानिक ग्रामस्थांच्यावतीने खिचडी केळीचा महाप्रसाद

पिंपळनेर : सतीश डोंगरे



**प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पिंपळनेर येथे आषाढी एकादशीचे निमित्त साधून हजारो भाविकांनी संत निळोबारायांचे मनोभावे दर्शन घेतले.नगर आणि पुणे जिल्ह्यातील भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.**

संत निळोबारायांचे दर्शन घेण्यासाठी आज पहाटेपासूनच गर्दी झाली होती नऊच्या सुमारास ही गर्दी वाढत गेली त्यानंतर दर्शनासाठी भाविकांची भली मोठी रांग लागली. पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... नामाचा गजर करीत भाविकांनी मंदिर परीसर दुमदुमून सोडला.संत निळोबाराय यांच्या दर्शनानंतर मंदिरापासून जवळच असलेल्या निळोबाराय यांच्या देऊळवाड्याला भाविक भेट देत होते त्या ठिकाणीही दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. दोन्ही ठिकाणी ध्वनीक्षेपणावरून भाविकांना विविध सूचना देण्यात येत होत्या. विठ्ठल रुक्मिणी मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

आषाढी एकादशीनिमित्त मंदिर परिसरात पुजा साहित्य, प्रसाद, खाद्यपदार्थ, खेळणी तसेच विविध साहित्याची दुकाने विक्रेत्यांनी थाटली होती. भक्त निवासाच्या समोर दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी आणि केळीचे वाटप केले जात होते. दुसऱ्या बाजूला एका विशेष कक्षावरून ध्वनीक्षेपकाद्वारे भाविकांना मंदिरासाठी देणगी देण्याचे आवाहन करण्यात येत होते.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना कुठलीही कमतरता जाणवू नये, भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शन सुलभ व्हावे, यासाठी नियोजन करण्यात आले होते. परिसरातील विविध गावांच्या शाळांमधून विद्यार्थी सहलीद्वारे दर्शनासाठी आले होते. मंदिर परिसरात अनेक सहकुटुंब आलेले अनेक भाविक मोबाईल मधून सेल्फी टिपताना दिसून येत होते.

संत निळोबाराय मंदिरात ३६५ दिवस २४ तास दिवस रात्र अखंड विणावादन चालू असते. या विणेकरांच्या दर्शनासाठी ही भाविकांची लगबग सुरु होती. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी संत निळोबारायांचे दर्शन घेतले.मंदिर परिसरातील उर्वरीत पान ३ वर

# आक्षेप घेतलेल्या ईव्हीएम मशीनचे मॉक पोल होणार

डॉ.सुजय विखे यांच्या तक्रारीवरून निवडणूक आयोगाचा निर्णय

नगर : प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांची मागणी अखेर मान्य करण्यात आली आहे. सुजय विखे पाटील यांनी केलेल्या मागणीनुसार ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी होणार आहे. आक्षेप घेतलेल्या मतदान केंद्रावर मशीनची मेमरी रिकामी करून पुन्हा मतदान प्रक्रिया म्हणजेच मॉकपोल राबवली जाणार आहे.**



डॉ. सुजय विखे पाटील यांनी ४ जूनला मतमोजणी पार पडल्यानंतर १० जून रोजी मतदारसंघातील ४० मतदान केंद्रावरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागाकडे अर्ज केला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने आता जिल्हा निवडणूक विभागाला मॉकपोल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आता या मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी केली जाणार आहे.

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात पुन्हा एकदा मतदान यंत्राची तपासणी करून मतमोजणी होणार आहे. ज्या ४० मतदान केंद्रावर सुजय विखे पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. त्या ठिकाणी व्हीव्हीपॅटची मोजणी होणार आहे. ही मोजणी आणि पडताळणी कशा पद्धतीने होणार आहे हे जाणून घेण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत.

**अशी केली जाणार मतदान यंत्राची पडताळणी**

- सुरुवातीला ईव्हीएम बनवलेल्या कंपनीचे अधिकारी मशीनची तांत्रिक तपासणी करतील.
- यानंतर आक्षेप घेतलेल्या ४० यंत्राची मेमरी रिकामी केली जाईल.
- यानंतर शेजारीच तयार केलेल्या मतमोजणी कक्षात पेपर स्लीप (व्हीव्हीपॅट) आणि ईव्हीएम मशीनवरील मतांची पडताळणी केली जाणार आहे.
- एका मशीनमध्ये प्रत्येकी १ ते १४०० मते टाकता येणार आहेत. किती मते करायचे हे ठरवण्याचे अधिकार उमेदवारांना आहेत.
- ही सर्व प्रक्रिया सीसीटीव्हीच्या निगरानीत पार पडणार आहे.

# पंढरपुरात विठू नामाचा गजर..!

■ मुख्यमंत्र्यांनी पाऊस अन् शेतकरी सुखासाठी घातले साकडे ■ नाशिकच्या अहिरे दाम्पत्याला शासकीय महापूजेला उपस्थित राहण्याचा मान

पंढरपूर : प्रतिनिधी

**आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा देखील संपन्न झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्निक ही शासकीय महापूजा पार पाडली. भाविकांची विक्रमी गर्दी, टाळ मृदुंगाचा जयघोष, भजन, हरिनामाच्या गजराने अवघी पंढरपूर नगरी दुमदुमून निघाली आहे.**

दरम्यान आषाढी एकादशीनिमित्त यंदा विठ्ठल-रखुमाईच्या शासकीय पुजेचा मान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाला. त्यांच्या सोबतच नाशिक जिल्ह्यातील बाळू शंकर अहिरे व आशा बाळू अहिरे या वारकरी दाम्पत्याला शासकीय महापूजेसाठी उपस्थित राहण्याचा मान मिळाला. अहिरे दाम्पत्य हे नाशिक जिल्ह्यातील अंबासन येथील रहिवासी आहे. हे दाम्पत्य गेल्या १६ वर्षांपासून अखंडपणे पंढरपूरच्या वारीत सहभागी होत वारी करत आहेत.

आषाढी यात्रेनिमित्त पंढरपुरात भाविकांची मांदियाळी बघावयास मिळाली. जवळपास १५ लाख भाविक पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरा दाखल झाले होते.चंद्रभागेच्या तिरावर स्नानासाठी पहाटेपासूनच



भाविकांची गर्दी झाली होती. विठ्ठलाची शासकीय महापूजा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आपल्या कुटुंबासोबत रुक्मिणीच्या पूजेला गेले. त्यांच्यासोबत मानाचे वारकरी अहिरे दाम्पत्य देखील होते. रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक मुख्यमंत्र्यांनी पूजा केली. प्रसाद म्हणून शिंदेंना श्रीफळ, तुळशी हार आणि विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा देण्यात आली.

**राज्यात भरपूर पाऊस पडू दे : मुख्यमंत्री शिंदे**

राज्यातील वारकरी, शेतकरी सुखी होऊ दे, चांगला पाऊस पडू दे, पिक चांगले येऊ दे, बळीराजाला सुखी-समाधानी राहू दे, असे साकडे आपण विठुरायाच्या चरणी घातल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांसोबत संवाद साधला.

**माझा शेतकरी सुखी-समाधानी राहू दे**

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, यंदा पंढरपुरात विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मोठ्या संख्येने वारकरी, बंधू-भगिणी दर्शनाला आले आहेत. राज्यातील कष्टकरी, शेतकरी आणि प्रत्येक घटकाला चांगले आणि सुगीचे दिवस येऊ दे, अशी प्रार्थना आपण विठुरायाच्या चरणी केल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**पालखी मार्गावर वृक्षारोपणचा सर्वांनी संकल्प करूया**

वातावरणातील बदलामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एक वारकरी एक झाड ही उर्वरीत पान ३ वर

# लाडकी बहीणनंतर भाऊरायांसाठी मुख्यमंत्र्यांची योजना

दरमहा १० हजार मिळणार | पंढरपुरातून घोषणा

पंढरपूर : प्रतिनिधी

**लाडकी बहीण योजनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी युवा भाऊरायांसाठीही महत्त्वाची घोषणा केली आहे. पंढरपुरात विठुरायाची महापूजा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांसाठीही खास योजना जाहीर केली. त्यानुसार बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमाधारक विद्यार्थ्यांना दरमहा आठ हजार रुपये, तर पदवीधर युवकांना दरमहा दहा हजार रुपये स्टायपंड मिळू शकते.**



आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरात विठुरायाची सपत्नीक शासकीय महापूजा केली. यावेळी त्यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी पंढरी महोत्सवाचे उद्घाटनही केले. सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, उर्वरीत पान ३ वर









# प्रगतीमंत्र

## व्हा भूलतज्ज्ञ!

**ॲनेस्थेसियोलॉजी हा औषधाचा अभ्यास करणाऱ्या लोकांसाठी करिअरचा एक चांगला पर्याय आहे. वैद्यकीय क्षेत्रातील हे एक प्रतिष्ठित आणि किफायतशीर क्षेत्र आहे ज्यासाठी विशेष प्रशिक्षण आवश्यक आहे. शस्त्रक्रियेच्या प्रक्रियेत 'भूलतज्ज्ञ' खूप महत्त्वाची भूमिका बजावत असून, ते रुग्णांच्या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांच्या महत्त्वाच्या लक्षणांचे निरीक्षण करतात. वास्तविक, 'भूलतज्ज्ञ' हा एक डॉक्टर असतो जो शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाला द्यावयाच्या औषधांचा आणि औषधांचा डोस ठरवतो. जर तुम्हाला वैद्यकशास्त्रात रस असेल, तर तुम्ही या क्षेत्रात करिअर करून चांगली कमाई करू शकता. 'ॲनेस्थेसियोलॉजिस्ट' किंवा 'ॲनेस्थेटिस्ट' कसे बनायचे? त्यासाठी कोणता कोर्स करायचा? या क्षेत्रात करिअरला किती वाव आहे? हे व्यावसायिक किती कमावतात? याबद्दल जाणून घेऊया...**



### ✓'ॲनेस्थेसियोलॉजिस्ट' कामाचे स्वरुप

कोणत्याही शस्त्रक्रियेपूर्वी भूलतज्ज्ञाचा सल्ला आवश्यक असतो. रुग्णाच्या आरोग्याच्या मूल्यांकनावर आधारित तो भूल आणि औषधांचा डोस ठरवतो. शस्त्रक्रियेदरम्यान ते खात्री करतात की रुग्ण वेदना किंवा अस्वस्थता अनुभवत नाही. वेगवेगळ्या शस्त्रक्रियेदरम्यान, रुग्णाच्या वेदना कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. ते रुग्णाच्या हृदयाचे ठोके, शरीराचे तापमान, ऑक्सिजन पातळी, रक्तदाब इत्यादींवर लक्ष ठेवतात. हे शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाची स्थिती सामान्य करण्यास मदत करतात.

### ✓नोकरी अन् करिअर संधी

भूलतज्ज्ञ करिअरमध्ये संधींची कमतरता नाही. ते कोणत्याही वैद्यकीय विद्यापीठ, संस्था, सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील रुग्णालयात त्यांची सेवा देऊ शकतात. ॲनेस्थेसियोलॉजी कोर्सेस अनेक संस्था, विद्यापीठे ॲनेस्थेसियासाठी अभ्यासक्रम ऑफर करतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना ॲनेस्थेसियोलॉजिस्ट आणि ॲनेस्थेसियोलॉजिस्टचा व्यवसाय करण्याची संधी मिळते. या क्षेत्रात पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. भूलतज्ज्ञ होण्यासाठी वैद्यकशास्त्रातील सर्व विशेष विषयांवर चांगली पकड आणि व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. एमबीबीएस पदवीसाठी बारावीनंतर NEET परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एमबीबीएस केल्यानंतरच तुम्ही भूलतज्ज्ञ म्हणून करिअर करू शकता.

### ✓भूलतज्ज्ञचा पगार किती?

या क्षेत्रातील भूलतज्ज्ञ उमेदवारांना आकर्षक पगार मिळतो. तथापि, इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे, येथे पगार देखील उमेदवाराच्या अनुभवावर, नोकरीचे स्थान आणि नोकरी प्रोफाइलवर अवलंबून असतो. भारतातील ॲनेस्थेसियोलॉजिस्टचे सरासरी वेतन पॅकेज सुमारे १२ लाख रुपये आहे. करिअरच्या सुरुवातीला ३० ते ५० हजार रुपये दरमहा उपलब्ध असतात. तासाभराचे काम करणारे अनुभवी ॲनेस्थेसियोलॉजिस्ट बरेच पैसे मिळवू शकतात.

## इंटर्नशिपदरम्यान 'या' टिप्स करा फॉलो

- गंभीर व्हा : इंटर्नशिप दरम्यान सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या बाबतीत गंभीर असणे. प्रत्येक गोष्टीला गांभीर्याने घ्या. इंटर्नशिप ही व्यावसायिक जीवनाची पहिली पायरी आहे. जर तुम्ही कामाबद्दल गांभीर्य दाखवले आणि सतर्कता बाळगली तर ही गोष्ट तुमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास नक्कीच येईल. ज्यामुळे तुम्हाला येणाऱ्या भविष्यात आणखी चांगल्या संधी मिळू शकतात.
- वर्क कल्चर समजून घ्या : या काळात आपल्याला वर्क कल्चर समजते. कंपनीच्या कामाशी जुळवून कसे काम करावे? कंपनीचे जॉब मार्केट काय आहे? तुम्हाला कोणते प्रोजेक्ट हवे आहेत? त्यावर कसे काम करावे लागेल? एका ठराविक मुदतीत संपूर्ण काम कसे पूर्ण करायचे हे समजून घ्या. व्यावसायिक जीवनातील प्रत्येक लहान- मोठ्या गोष्टी या इंटर्नशिप दरम्यान शिकवल्या जातात. त्यामुळे हा टप्पा प्रत्येक उमेदवारासाठी खूप महत्त्वाचा असतो.
- गोष्टी शिकण्यात स्वारस्य दाखवा : हा असा टप्पा आहे जिथे तुम्ही सर्वात जास्त शिकू शकता. त्यामुळे तुमच्याकडे काम नसले तरीही तुमच्या वरिष्ठांशी स्वतः बोलण्याचा प्रयत्न करा. त्यांना कळू द्या की तुम्हाला प्रोजेक्ट्सवरही काम करायचे आहे. तुमची आवड दाखवा. ज्यामुळे त्यांना कळेल की तुम्हाला नवीन गोष्टी शिकण्यात रस आहे. यामुळे तुम्ही कामाला घाबरत नाही, तर समोरून स्वतःहून काम करा.
- डेडलाइन पाळा : व्यावसायिक जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डेडलाइन, कारण ठरलेल्या डेडलाइनमध्ये काम पूर्ण झाले नाही तर काही उपयोग होणार नाही. त्यामुळे काम वेळेत पूर्ण करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. असे करण्यात अयशस्वी झाल्यास तुमच्या बॉस आणि वरिष्ठांवर चांगली छाप पडणार नाही. त्यामुळे या गोष्टीची विशेष काळजी घ्या.



## कॉमर्समधून बारावी झालीये?

**बारावीचा निकाल लागल्यानंतर पालकांची व मुलांची चिंता वाढू लागली. बारावी तर झाली पण पुढे काय हा प्रश्न सतत त्यांना सतावत असतो. त्यात जर कॉमर्स सारखा विषय असेल तर आणखीनच प्रश्न पडू लागतात. पण जर तुम्ही कॉमर्स क्षेत्रात तुमचे करिअर करण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला अकाऊंट्स, फायनान्स, बिझनेस स्टडीज हे विषय चांगले पर्याय आहेत. परंतु करिअरचे सर्व पर्याय आणि ग्रॅज्युएशनसाठी पुढे कोणते पर्याय चांगले आहेत हे समजून घेऊया...**

- बॅचलर ऑफ कॉमर्स (B.Com) : अनेकदा कॉमर्समधून 12 वी केल्यानंतर, विद्यार्थी B.Com निवडतात, ज्यामध्ये तुम्हाला 3 वर्षांचे ग्रॅज्युएशन करता. यामध्ये अकाउंट्स, स्टॅटिस्टिक्स, मॅनेजमेंट आणि ह्युमन रिसोर्स हे विषय शिकवले जातात. जर तुम्हाला अर्थशास्त्र आवडत असेल आणि तुम्हाला अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात करिअर करायचे असेल तर हा सर्वोत्तम पर्याय आहे.
- बॅचलर ऑफ लेजिस्लेटिव्ह लॉ (LLB) : जर तुम्ही कॉमर्समधून 12 वी केली असेल, तर LLB करणे हा एक चांगला पर्याय असू शकतो. यामध्ये बार कौन्सिल ऑफ इंडिया मधून पदवी मिळवल्यानंतर तुम्ही वकील बनू शकता. तुम्हाला कौटुंबिक वकील, मालमत्ता वकील किंवा कंपनीचे वकील बनायचे आहे की नाही हे तुमच्या विषयांवर अवलंबून असेल. केवळ वाणिज्य पार्श्वभूमीच नाही तर कला लोक देखील याचा पर्याय निवडू शकतात.
- चार्टर्ड अकाउंटंट (CA) : सीए म्हणजेच चार्टर्ड अकाउंटंट हा व्यावसायिक अभ्यासक्रम मानला जातो, ज्यामध्ये फक्त कॉमर्सचे विद्यार्थी जाऊ शकतात. या कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला खूप स्पर्धा करावी लागेल आणि अनेक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर याचे शिक्षण सुरू होते. चार्टर्ड अकाउंटंट हे कोणत्याही बॅचलर डिग्रीच्या तुलनेत खूपच अवघड आहे.
- बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (BBA) : जर तुमचे करिअरचे ध्येय बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये जाण्याचे असेल तर बीबीए करणे तुमच्यासाठी अधिक चांगले होईल. हे तीन वर्षांचे ग्रॅज्युएशन आहे, ज्याला कॉमर्सच्या अनेक विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे. यामध्ये तुम्हाला व्यवसायाशी संबंधित सर्व अभ्यास शिकवले जातात आणि तुम्हाला कॉर्पोरेट ऑपरेशनशी संबंधित सर्व गोष्टी अगदी सुरुवातीपासून शिकायला मिळतात.
- कंपनी सेक्रेटरी (CS) : CS कोर्स देखील प्रशासनाच्या अंतर्गत येतो, जो इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) द्वारे आयोजित केला जातो. अनेक वाणिज्य पार्श्वभूमीचे विद्यार्थी हे निवडण्यास प्राधान्य देतात; परंतु त्यात सीए सारखी कठीण प्रवेश परीक्षा देखील असते.
- बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स : बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स ही 3 वर्षांची पदवी आहे, ज्यामध्ये तुम्ही अर्थशास्त्र वित्त आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा अभ्यास करता. अर्थशास्त्रात आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी बॅचलर ऑफ इकॉनॉमिक्स करावे. इतकेच नाही तर यामध्ये तुम्ही सूक्ष्म- अर्थशास्त्र आणि मॅक्रो- इकॉनॉमिक्सचा सखोल अभ्यास करून वित्त क्षेत्रात जाता येते.
- जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन : जर तुम्हाला मीडिया किंवा जनसंपर्क क्षेत्रात जायचे असेल तर तुमच्यासाठी पत्रकारिता आणि जनसंवाद हा एक चांगला पर्याय असेल. यामध्ये फायनान्स आणि बिझनेसचे ज्ञान घेऊन तुम्ही मीडियामध्ये करिअर करू शकता. याशिवाय अर्थशास्त्राचे चांगले ज्ञान असल्यास तुम्ही प्रिंट, ऑनलाइन किंवा कंटेंट निर्मितीमध्ये करिअर करू शकता.
- बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS) : जर तुम्हाला मॅनेजमेंट क्षेत्रात करिअर करायचे असेल तर बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (BMS) करणे तुमच्यासाठी चांगले राहील. यामध्ये व्यवस्थापन कौशल्य आणि नेतृत्व चांगले शिकवले जाते. एवढेच नाही तर मानव संसाधन, संशोधन पद्धती याविषयीही शिकवले जाते.
- प्रमाणित आर्थिक नियोजक : वैयक्तिक वित्त, संपत्ती व्यवस्थापन, विमा नियोजन यांसारखे अभ्यास करण्यासाठी तुम्ही प्रमाणित वित्तीय नियोजक करू शकता. याला (CFP) असेही म्हणतात आणि वित्त संबंधित संपूर्ण शिक्षण त्यात केले जाते. जर तुम्हाला या क्षेत्रात करिअर करायचे असेल तर तुम्ही बारावीनंतर सीएफपी करू शकता.
- कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट (CMA) : तुम्हाला मॅनेजमेंट अकाउंटिंग, कमर्शियल फंडामेंटल्स आणि इंडस्ट्रियल लॉ या विषयांचा अभ्यास करायचा असेल, तर तुम्ही कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट निवडू शकता. यामध्ये फायनान्स आणि मॅनेजमेंट हे दोन्ही विषय शिकवले जातात आणि कोर्स पूर्ण केल्यानंतर मॅनेजमेंट क्षेत्रात नोकरी मिळते.



**जगात सर्वत्र आर्थिक घडामोडी मोठ्या प्रमाणावर घडत असतात किंबहुना बहुतेक घडामोडींचे केंद्र हे अर्थकारणच असते. त्यामुळे वाणिज्य क्षेत्राची निवड ही या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना व्यापार, व्यवसाय, बाजारातील चढउतार, अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे, सरकारची वित्तीय धोरणे, औद्योगिक धोरण, शेअर मार्केट आदी बाबींचे ज्ञान प्राप्त होते. बारावीनंतर इच्छुक उमेदवार बी.कॉम आणि त्यानंतर एम.कॉम करू शकतो. या दरम्यान संबंधित विद्यार्थ्यांचा वित्त, व्यवसाय प्रशासन, लेखा, ई-कॉमर्स, विक्री, विपणन आदी विषयांचा अभ्यास होतो.**

## वाणिज्य क्षेत्रातील संधी

बारावीनंतर वित्त, विमा, बँकिंग, चार्टर्ड अकाउंटन्सी, परदेशी व्यापार, स्टॉक ब्रोकिंग ॲण्ड इव्हेन्स्टमेंट ॲनॅलिस्ट यांसारखे अभ्यासक्रम करता येतात. गेल्या काही वर्षांत बॅचलर इन अकाउंटन्सी ॲण्ड फायनान्स, बॅचलर इन बँकिंग ॲण्ड इन्शुरन्स, बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट्स असे वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम काही संस्थांनी सुरू केले आहेत. बिझनेस इकॉनॉमिक्स, फायनान्स ॲण्ड कंट्रोल या विषयातही पदव्युत्तर पदवी प्राप्त करता येऊ शकते. वाणिज्य शाखेत पदव्युत्तर पदवी घेतलेल्या उमेदवारांना अध्यापन, नागरी सेवा, उच्च शिक्षण, बँकिंग क्षेत्र, ब्रोकिंग, संशोधन, विमा क्षेत्र, वित्तीय संस्था, कॉस्ट अकाउंटन्ट, कंपनी सेक्रेटरी, चार्टर्ड अकाउंटन्ट अशा काही संधी मिळू शकतात. बी.कॉम. आणि एमबीए अशा पदव्या प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील कंपन्या, कॉर्पोरेट्स या ठिकाणी उत्तम संधी मिळू शकते. जो उमेदवार संख्याशास्त्रावर प्रभुत्व मिळवतो त्यास वित्तीय अभियांत्रिकी (फायनान्शिअल इंजिनीअरिंग) या उच्च श्रेणीच्या व आव्हानात्मक कार्य क्षेत्रात काम करण्याची संधी मिळू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या घटकांमध्ये बँक डिपॉझिट्स, म्युच्युअल फंड, स्टॉक मार्केट्स, व्हेंचर कॅपिटल, विमा, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट यामध्ये सातत्याने नव्या बाबी घडत आहेत. त्याचाही लाभ वाणिज्य शाखेतील प्रशिक्षित उमेदवार घेऊ शकतात. जागतिकीकरणानंतर जगभरातील बँका आणि विमा कंपन्यांनी आपले जाळे सर्वत्र पसरवण्यास सुरुवात केल्याने या कंपन्यांना तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज भासते आहे. यामुळे वाणिज्य शाखेची पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना करिअर घडवण्याचे नवे पर्याय उपलब्ध झाले आहेत. एमबीए (फायनान्स) हा अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. व्यावसायिक आणि व्यापारी उलाढालीचे उत्तम ज्ञान वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी मिळवले असल्याने त्यांना ई-कॉमर्स क्षेत्रातही चांगली कामगिरी करता येऊ शकते.



### संबंधित स्पेशलाइज्ड अभ्यासक्रम

- चार्टर्ड अकाउंटंट : द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ही संस्था या विषयाशी निगडित अभ्यासक्रम चालवत असते. बारावी उत्तीर्ण कोणत्याही ज्ञानशाखेतील उमेदवार या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. संपर्क- www.icai.org
- कंपनी सेक्रेटरी : द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया या संस्थेने कंपनी सेक्रेटरीशिपचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा अभ्यासक्रम त्रिस्तरीय आहे. फाउंडेशन कोर्स कोणत्याही शाखेच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्याला करता येतो. आता या संस्थेने पदवीनंतरचा तीन वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू केला आहे. संपर्क- www.icsi.org
- कॉस्ट ॲण्ड वर्क अकाउंटंट (सीडब्ल्यूए) : इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क अकाउंटंट ऑफ इंडिया या क्षेत्रातील अभ्यासक्रम चालवते. तो फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल असा त्रिस्तरीय आहे. फाउंडेशन अभ्यासक्रम बारावी उत्तीर्ण विद्यार्थी करू शकतात. इंटरमिजिएट अभ्यासक्रमास कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधर थेट अर्ज करू शकतात. संपर्क- www.icwai.org
- चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिस्ट : पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट, इन्व्हेस्टमेंट बँकिंग, इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट, इंटरनॅशनल फायनान्स ॲण्ड रिसर्च या क्षेत्रांत करिअर घडवण्यासाठी संबंधित उमेदवार आपले कौशल्य वापरू शकतात. माहिती तंत्रज्ञानाचे कौशल्य अवगत केल्यास संधी आणखी वाढू शकते. चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिस्ट होण्यासाठी आयसीएफएआय (इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड फायनान्शिअल ॲनॅलिसिल ऑफ इंडिया) या संस्थेचा त्रिस्तरीय अभ्यासक्रम करावा लागतो. हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन पद्धतीनेही करता येतो. संकेतस्थळ- www.icfai.org
- बँकिंग : वाणिज्य शाखेच्या पाश्र्वभूमीसोबत एमबीए, सीए, सीएफए (चार्टर्ड फायनान्शिअल अकाउंटंट) अशा पदव्या असल्यास या क्षेत्रात उच्च श्रेणीच्या संधी मिळू शकतात. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील बँकांनी आता गृह, शैक्षणिक, घरगुती वस्तू कर्ज, म्युच्युअल फंड, कॅपिटल मार्केट, विमा अशा क्षेत्रांत भूमिका विस्तारल्याने त्यांना तज्ज्ञ उमेदवारांची गरज मोठ्या प्रमाणावर भासू लागली आहे.
- गुंतवणूक : या क्षेत्रात रिसर्च ॲनॅलिस्ट, इन्व्हेस्टमेंट बँकर, म्युच्युअल फंड एक्झिक्युटिव्ह, कॅपिटल मार्केट मॅनेजर, फायनान्शिअल प्लॅनर, ॲसेट मॅनेजर, व्हेंचर कॅपिटॅलिस्ट आदी करिअर संधी मिळू शकतात.
- विमा क्षेत्र : भारतात हे क्षेत्र गतीने वाढत आहे. या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर विशिष्ट कालावधीच्या अनुभवानंतर उमेदवारांना उत्तमोत्तम करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. ॲक्चुरिअल सोसायटी ऑफ इंडियामार्फत घेण्यात येणारी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. विमा क्षेत्रात काम करण्यासाठी परवान्यासाठी गरज भासते.

### करिअर संधी

अकाउंटन्ट, फायनान्स कंट्रोलर, अकाउंटन्ट एक्झिक्युटिव्ह, चार्टर्ड अकाउंटन्ट, कंपनी सेक्रेटरी, फायनान्स ॲनॅलिस्ट, फायनान्स कंट्रोलर, फायनान्स मॅनेजर, फायनान्स कन्सल्टंट, इनव्हेस्टमेंट ॲनॅलिस्ट, स्टॉक ब्रोकर, पोर्टफोलिओ मॅनेजर, टॅक्स ऑडिटर, टॅक्स कन्सल्टंट, ऑडिटर, स्टॅटिस्टियन, इकॉनॉमिस्ट, क्रेडिट मॅनेजर, ज्युनिअर अकाउंटंट, बुक कीपर, इंटरनेट मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह- ईकॉमर्स, कॉर्पोरेट लॉयर.

## शॉर्ट न्यूज

### तणनाशक मारल्याने ५ एकर सोयाबीन जळाली

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील नायगाव येथील प्रगतिशील शेतकरी सुनील प्रकाश लांडे यांच्या गट नंबर ५ मधील पाच एकर सोयाबीनमध्ये तणनाशक मारल्याने सोयाबीन पीक जळाले, त्यामुळे या शेतकऱ्याचे लाखोचे नुकसान झाले आहे. सदर कंपनीने नुकसान भरपाई देण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी तालुका कृषी अधिकारी तसेच जिल्हाधिकारी तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे कैफियत मांडली असून झालेल्या नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

### जोरदार पावसाने खरीप पिकांना दिलासा

■ **नेवासा :** तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. शेतकऱ्यानी सध्या कपाशी, तुर, मूग, सोयाबीन लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. सर्वत्र खरीप पिके जोमदार आहेत. त्यात पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्याची चिंता वाढली होती. आता पाऊस पडल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे. पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. पावसाळा सुरू झाला असल्याने नदी नाले, ओढ्यातील कचरा साफ सफाई करून पाणी प्रवाह सुरळीत करण्याची मागणी केली जात आहे. वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी प्रशासनाने मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

### आ.रोहित पवार यांच्या पाठपुराव्याला यश

■ **जामखेड :** मतदारसंघातून वाहणाऱ्या सीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे लातूर बॅरेज टाईप मध्ये रूपांतर करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी महाविकास आघाडीच्या काळात सरकारकडे केली होती. त्यास अखेर मंजुरी मिळाली असून त्यासाठी ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सीना नदीवर एकूण लघु पाटबंधारे विभागाचे १० बंधारे असून त्यातील ६ बंधारे हे आष्टी विभागात येतात तर ४ बंधारे कर्जत जामखेड मतदारसंघात येतात.

### धर्मनाथ विद्यालयाचा शौर्य खोसे राज्यात नववा

■ **पारनेर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री धर्मनाथ विद्यालय जवळे (ता. पारनेर) या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळविले. विद्यालयाची दैदीप्यमान यशाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली. महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत शौर्य राजेंद्र खोसे २७८ गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीमध्ये नववा आला. तर राष्ट्रीय ग्रामीण गटातून राज्यात दुसरा आला. सोहम विशाल सालके याने २३० गुण मिळविले या दोन्ही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. ५ वी चे २० शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले.

### कांद्याच्या आवकेत घट; भाव स्थिर

■ **नेवासा :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार घोडेगाव येथील कांदा मार्केटमध्ये काल कांद्याची ४४ हजार ५२३ कांदा गोण्याची आवक झाली. कांद्याला भाव जास्तीत जास्त ३ हजारांपर्यंत मिळाले. एक-दोन लॉटला ३१०० ते ३२०० रुपयांचा भाव मिळाला. मोठ्या कांद्याला २७०० ते ३००० रुपये, मुक्कल भारी २६०० ते २७०० रुपये, गोल्टा २५०० ते २८००, गोल्टी २४०० ते २५००, हलका डॅमेज व जोड कांद्याला १००० ते १४०० रुपयांचा भाव मिळाला. सदरचे बाजार भाव घोडेगाव उपबाजार समितीचे वतीने देण्यात आले.

# विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर महागणपती चरणी लीन !

**■ अजितदादांच्या विश्वासाला पात्र ठरण्याची ग्वाही ■ अमोल वर्पे यांच्या हस्ते सत्कार**

**शिरुर : प्रतिनिधी**

**विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार राजेश विटेकर यांनी मंगळवारी अष्टविनायकांपैकी एक असलेल्या रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेतले यावेळी शिरुर राष्ट्रवादी तालुका युवकचे अध्यक्ष अमोल वर्पे यांनी त्यांचा सत्कार केला.**

यावेळी रांजणगाव देवस्थान ट्रस्टचे सचिव तुषार पाचुंदकर, राष्ट्रवादीचे युवकचे उपाध्यक्ष सोमनाथ बोऱ्हाडे, गौरव सांगळे, स्वप्नील सावंत व राष्ट्रवादीचे अनेक युवा कार्यकर्ते उपस्थित होते. आमचे नेते अजितदादा यांनी माझ्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला मी पात्र ठरणार असून पुढील काळात संघटनेला महाराष्ट्र मध्ये बळकटी देण्याचे काम




मी करणार आहे, असे विटेकर यांनी यावेळी सांगितले.

आज खऱ्या अर्थाने एक निष्ठेला या महाराष्ट्रामध्ये न्याय मिळाला. आज राजेश विटेकरांची निष्ठा कामाला आली व त्यांना विधान परिषदेचे आमदार म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संधी दिली ते नक्की या संधीचे सोने करतील याबाबत कोणतीच शंका नाही, असे अमोल वर्पे यांनी सांगितले.

विटेकर यांनी यावेळी संपूर्ण मंदिर परीसराची पहाणी करून देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली व ट्रस्ट पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

# टपाल खात्याच्या विविध योजना कर्मचाऱ्यांनी जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत

**डाक निर्देशक सिमरण कौर यांचे आवाहन**

**नगर : प्रतिनिधी**

**टपाल खात्याच्या विविध योजना टपाल कर्मचाऱ्यांनी तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन डाक निर्देशक सिमरण कौर यांनी केले आहे.**

नगर जिल्ह्यातील टपाल अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा डाक निर्देशक सिमरण कौर व अहमदनगर टपाल विभागाचे प्रवर अधिक्षक बी नंदा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या.

कौर यावेळी म्हणाल्या दहा पंधरा वर्षांपूर्वीचे दिवस आणि आजचे दिवस यामध्ये टपाल खात्यामध्ये महत्वपूर्ण बदल झाले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले असून याचा फायदा टपाल खात्याला मोठ्या प्रमाणात झाला असून आजचा अधिकारी असो की कर्मचारी हे हायटेक तंत्रज्ञानाशी समन्वय साधणारे असण्याची गरज असून टपाल विभागाशी जनता मोठ्या प्रमाणात जोडली जाईल अशी सेवा आपणाकडून अपेक्षित असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.




टपाल विभागांमध्ये सध्या सकारात्मक बदल दिसुन येत आहे,टपाल कर्मचारी जोमाने काम करत आहे.पोस्ट खाते अ.नगर विभाग पोस्टाच्या विविध योजना राबविण्यात राज्यात निश्चितच आघाडीवर राहिल असा विश्वास अ.नगर टपाल विभागाचे प्रवर अधिक्षक बी नंदा यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी पुरस्कार प्राप्त संतोष यादव,महेश तामटे ,ऋतिका कराळे ,वाल्मिक जाधव, बहिरु नेब,नितिन खेडकर,आरती हिरवे यांनी मनोगत व्यक्त केले.
संतोष यादव,महेश तामटे, वंदना नगरकर ,बाळासाहेब सोनवणे, रमेश घुले , त्रुप्ति जोशी, संजय कदम,अमोल साबळे , संतोष झावरे, प्रशांत खोडदे , अनिल लोटके , बळवंत माने, प्रियंका वारुळे , बशीर शेख, गौरी पवार,रुपाली खेडकर , रमेश मगर, पिरमहंमद चौगुले, राजेंद्र कोल्हे ,युवराज राऊत , नवनाथ शिंदे , लक्ष्मण ढवळे , आरती हिरवे , दिलीप उनवणे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.प्रास्तविकात सहाय्यक अधिक्षक संदीप हदगल यांनी माहिती दिली. सुत्रसंचालन मुस्कान शेख यांनी तर आभार अक्षय शिरसाट यांनी मानले.

(पान १ वरून)

## प्रतिपंढरी पिंपळनेरमध्ये भाविकांची मांदियाळी !

दाट झाडे तर एका बाजूला मंदिर आणि दुसऱ्या बाजूला भक्तनिवास आणि दोघांच्या मधून वाहणारे ओढ्याचे झुळझुळ पाणी अशा निसर्गरम्य वातावरणात भाविक दर्शनानंतरही बराच वेळ रमत होते. चारचाकी गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहनचालकांची मात्र काहीशी गैरसोय होत होती. पारनेर पोलीस ठाण्याच्या वतीने यावेळी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पंढरपुरात विठू नामाचा गजर..!

संकल्पना राबवून पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याचा सर्वांनी संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

**पंढरपुरात टोकन दर्शन व्यवस्था सुरू करणार**

तिरुपती बालाजीच्या धर्तीवर पंढरपुरात टोकन दर्शन व्यवस्था सुरू करण्यात येईल. यामुळे पंढरपूरला विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाचे सुलभ आणि कमीत कमी वेळेत पदस्पर्श दर्शन घेता येईल. यासाठी राज्य सरकारकडून १०३ कोटी रुपयांचा निधी लवकरच देईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महापूजा संपन्न झाल्यावर मंदिराच्या सभा मंडळात झालेल्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**आम्ही या गोष्टीचा कधी स्वप्नातही विचार केला नव्हता : अहिरे दाम्पत्य**

आम्ही दरवर्षी विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी गाडीवर येतो. दर्शन घेतल्यानंतर निघून जातो. यंदाही देवाचे दर्शन घ्यायचं आणि घरी निघून जायचे, असे आम्ही ठरवले होते. पण आम्हाला मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत विठुरायाची शासकीय पूजा करण्याचा मान मिळाला. आम्ही या गोष्टीचा कधी स्वप्नातही विचार केला नव्हता. गेल्या १६ वर्षांपासून आम्ही पंढरपूरची वारी करीत आहोत. विठुरायाच्या महापुजेचा मान मिळाल्याने आमचे जीवन सार्थक झाले आहे'', अशी प्रतिक्रिया बाळू अहिरे आणि आशाबाई अहिरे यांनी दिली.

## लाडकी बहीणनंतर भाऊरायांसाठी मुख्यमंत्र्यांची योजना

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत कार्यक्रमात बोलताना एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांसाठी एका योजनेची घोषणा केली.

**मुख्यमंत्री काय म्हणाले?**

आपल्या सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणली. या अंतर्गत राज्यातील महिलांना दरमहा १,५०० रुपये, म्हणजेच वर्षाकाठी १८ हजार रुपये दिले जातील. याशिवाय त्यांना दरवर्षी तीन गॅस सिलेंडर मिळणार आहेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे लवकरच महिलांच्या खात्यात वळवले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

लोकांनी आमच्यावर टीका केली की, लाडक्या बहिणीसाठी योजना आणली, पण लाडक्या भावांचं काय? लाडक्या भावांकडेही आमचं लक्ष आहे.आम्ही त्यांच्यासाठीही एक योजना आणत आहोत. जे तरुण बारावी पास झाले आहेत, त्यांना दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमाधारक तरुणांना आठ हजार, तर पदवीधर तरुणांना महिन्याला १० हजार रुपये दिले जातील.हे तरुण वर्षभर एखाद्या कारखान्यात अप्रेन्टिसशिप करतील, तिथे त्यांना कामाचा अनुभव मिळेल आणि त्या अनुभवाच्या जोरावर त्यांना नोकऱ्या मिळतील. एक प्रकारे आपण कुशल कामगार तयार करत आहोत. राज्यसह देशातील उद्योग जगताला कुशल तरुण पुरवणार आहोत, यासाठी सरकार पैसे भरणार आहे. इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या सरकारने अशी योजना आणली असून याद्वारे बेरोजगारीवर तोडगा निघणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.




## वाचकांच्या लेखणीतून

### विठ्ठल! विठ्ठल!!

आपल्या भारतीय भाषांतील शब्द आपल्याशी बोलतात. गुरू म्हणजे विशाल, मोठा. अष्टावक्र ऋषी म्हटल्यावर आठ ठिकाणी वाकड्या शरीराचे ऋषी आपल्याला आठवतात. संस्कृत भाषेतील विष्णु सहस्त्रनामात तर याचा आपल्याला भरपूर अनुभव येईल. द्रव म्हटल्यालवर संस्कृत भाषेतील द्रव् द्रवति या धातू आणि क्रियापदाची स्मृती जागी होते. द्रवणे हळूहळू वाहत पुढे जाणे. इतिहासात द्रवीड लोकांशीही याचा संबंध लावला जातो. उत्तर भारतातील आर्यांच्या रेट्यामुळे जे लोक सरकत सरकत (द्रवत) दक्षिण भारतात येऊन वसले ते द्रवीड लोक असाही उल्लेख सापडतो. (हा मुद्दा सर्वांनाच पटेल असे नव्हे. याचीही जाण ठेवूया).



knowledge of a word is the gate of scholarship (एका शब्दाचे सम्यक् ज्ञान होणे म्हणजे विद्वत्तेचे दार उघडणे) अशी इंग्रजी भाषेत एक म्हण आहे. तर आपल्या

**संत वाङ्मयात**
**तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव।**
**शब्देचि गौरव पूजा करूं।।**

असा उल्लेख आहे. असे हे शब्दमाहात्म्य आहे. शब्दमाहात्म्य काय किंवा देवाचे नाममाहात्म्य म्हणजे तरी काय आहे? विठ्ठल! विठ्ठल!! असे आपले वारकरी नाम स्मरण करतात, ते काय व्यर्थ म्हणून?

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# महायुती सरकारमुळे भोजापूर चारीचे काम अंतिम टप्प्यात

**मंत्री विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे मोठा दिलासा**

**संगमनेर : प्रतिनिधी**

**निळवंडे पाण्यापासून वंचित राहीलेल्या दुष्काळी पट्टयातील बारा गावांसाठी महायुती सरकारने दोन कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे भोजापूर चारीच्या सोळा किलो मीटर काम अंतिम टप्प्यात आल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



गेली अनेक वर्षे भोजापूर चारीचा प्रश्न प्रलंबित होता. त्यामुळे भोजापूर धरणात पाणी असूनही पाण्यापासून वंचित राहाण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत होती.विशेष म्हणजे ही गावे निळवंडे पाण्यापासून वंचित राहीलेली होती.या गावांना भोजापूर पाण्याशिवाय पर्याय नव्हता.निधी अभावी कामाची सुरूवात होत नव्हती.बहुतेक वेळा ठेकेदार बदलत गेल्याने कामातही अडथळे निर्माण होत होते.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंधारण विभागाकडून सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे या चारीच्या कामाला सुरूवात होवू शकली.आता चारीचे काम अंतिम टप्प्यात आल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा अधिकच वाढल्या आहेत. पावसाळ्यात या चारीतून पाण्याचे वहन होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

तळेगाव भाग नेहमीच दुष्काळी म्हणून ओळखला जायचा.आता निळवंडे कालव्यातून पाण्याची उपलब्धता झाल्याने वर्षानुवर्षे पाण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना युती सरकारमुळे न्याय मिळाला. आता भोजापूर चारीच्या सर्वच कामामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.भोजापूर लाभक्षेत्रातील शेतकर्याची अनेक वर्षांची प्रतिक्षा आता संपुष्टात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



# बा विठ्ठला, सर्वांना सुखात ठेव!

## सुजित झावरे पाटील यांचे पळशीच्या पांडूरंगाला साकडे



■ पळशी येथील विठ्ठल रूख्मिणी मंदिरात बुधवारी पहाटे जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली.

**पळशी : प्रतिनिधी**

**पंढरीच्या वारीमधील वारकरी हा खऱ्या अर्थाने कष्टकरी आहे. पंढरपूरच्या पांडूरंगावर तो निस्सीम प्रेम करतो. पांडूरंगाने सर्वांना सुखात ठेवावे असे साकडे जिल्हा परीषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी पळशीच्या पांडूरंगाला घातले.**

आषाढी एकादशी निमित्त पळशी येथील विठ्ठल रूख्मिणी मंदिरात झावरे पाटील यांच्या हस्ते बुधवारी पहाटे महापुजा करण्यात आली. त्यानंतर बोलताना त्यांनी उपस्थित भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, जिल्हयात, तालुक्यात यंदा चांगला पाऊस झाला, ही पांडूरंगाची कृपा आहे.पांडूरंगाची भक्ती करणाऱ्या वारकऱ्यांमुळे कोणाला काही कमी पडत नाही असा विश्वास झावरे यांनी व्यक्त केला.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. श्रीकांत पठारे यांनीही यावेळी पळशीच्या विठ्ठल रूख्मिणीचे दर्शन घेत सर्वांचे कल्याण कर अशी प्रार्थना केली. यावेळी गुरूदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे, देवस्थानचे अध्यक्ष मिठू जाधव, सरपंच प्रकाश राठोड, उपसरपंच नवनाथ अगिवले, मा. उपसरपंच अप्पासाहेब शिंदे यांच्यासह अनेक भाविक यावेळी उपस्थित होते.

### झावरे यांच्या पुढाकारातून देवस्थानचा विकास

**प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या तसेच पुराणात महत्व असेलेल्या पळशी येथील देवस्थानच्या विकासामध्ये सुजित झावरे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. राज्य शासनाच्या क वर्ग देवस्थान योजनेमध्ये या देवस्थानचा समावेश करून झावरे यांनी विविध कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.आजवर एक कोटी रूपयांचा निधी या देवस्थानसाठी देण्यात आला असून भविष्यातही निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटीबध्द असल्याची ग्वाही झावरे पाटील यांनी यावेळी बोलताना दिली.**

# लामखडे परिवाराकडून भाविकांना फराळ, फळे

## नीलेश लंके प्रतिष्ठाणचा उपक्रम

**राळेगणसिध्दी : प्रतिनिधी**

**निघोज येथील गणेशभाऊ लामखडे मित्र परिवार तसेच नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने पिंपळनेरला जाणाऱ्या भाविकांना फराळ तसेच फळांचे वितरण करण्यात आले. पाच हजार भाविकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.**

लंके प्रतिष्ठाणचे युवा शिलेदार तथा वडझिरे ग्रामपंचायतीचे सदस्य अनिल गंधाक्ते यांच्या हस्ते शाबुदाना खिचडी तसेच फळांच्या वितरणास बुधवारी सकाळी राळेगणसिध्दी येथे प्रारंभ करण्यात आला. पिंपळनेर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या व येणाऱ्या भाविकांनी फराळाचा लाभ घेतला. यावेळी गणेश लामखडे, कुलाबा येथील उद्योजक अमोलशेठ मोरे, आनंदाशेठ चौधरी, शिरूर पंचायत समितीचे सदस्य आबासाहेब सरोदे, समाधान सरोदे, सुजित भगत, बाबाजी ठुबे, किरण कारखिले, संतोष कारखिले, बाबाजी ठुबे, किरण कारखिले, संतोष कारखिले, चॉंद शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योजक गणेश लामखडे म्हणाले, गेल्या पाच वर्षांपासून आमचा परिवार नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या माध्यमातून आषाढी एकादशीनिमित्त पिंपळनेर येथे संत निळोबारायांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी तसेच दिंडीने जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी फराळाची व्यवस्था करत आहे. संत निळोबारायांच्या दर्शनासाठी जाणारे भाविक तसेच वारकऱ्यांमध्येच पंढरीचा पांडूरंग पाहून आम्ही ही सेवा करत असून या सेवेतून मिळणारे समाधान हे पुढील वर्षभरासाठी उर्जा देऊन जाते. यापुढील काळातही भाविकांसाठीची ही सेवा सुरू ठेऊन त्या माध्यमातून पांडूरंगाची सेवा करण्याचे भाग्य आम्हास मिळावे अशी अपेक्षा लामखडे यांनी व्यक्त केली.



■ आषाढी एकादशीनिमित्त पिंपळनेर येथे जाणाऱ्या भाविकांसाठी लामखडे परिवाराच्या वतीने फराळ तसेच फळांचे वितरण करण्यात आले.

### खा. लंके यांच्या कार्याला शोभणारा उपक्रम

**खा. नीलेश लंके हे नेहमीच सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जातात. पंढरीच्या वारीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी त्यांनी तीन दिवस अल्पोपहार, चहा तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. स्वतः खा. लंके यांनी वारकऱ्यांना अल्पोपहार देत, तेथे स्वच्छता अभियान राबवत आपले काम अधोरेखीत केले. त्यांचा मावळा असलेले गणेश लामखडे यांनी खा. लंके यांच्या कार्याला शोभणारा उपक्रम राबवून आदर्श ठेवला आहे.**

**अनिल गंधाक्ते**
सदस्य, वडझिरे ग्रामपंचायत

# पाराशरांच्या नगरीत अवतरले विठू माऊली !

## पोदार स्कुलचा दिंडी सोहळा पारनेरकरांना भावला



**पारनेर : प्रतिनिधी**

**आषाढी एकादशीनिमित्त गुरूमाऊली पोतदार लर्न स्कुलच्या वतीने पाराशर ऋषींच्या पावन भुमीत पार पडलेला बार वारकऱ्यांचा दिंडी सोहळा पारनेरकरांना चांगलाच भावला. दिंडीमध्ये विठ्ठल-रूख्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, मुक्ताबाई आदींच्या वेशभूषेतील विद्यार्थी या दिंडीचे प्रमुख आकर्षण होते.**

दिंडीच्या अग्रभागी फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीवर वेशभुषा केलेले विठ्ठल-रूख्मिणी तसेच विविध संत विराजमान झाले होते. संतांच्या पालखी सोहळयाप्रमाणे या दिंडी सोहळयात अश्वाचाही सहभाग होता. हा दिंडी सोहळा हनुमान मंदिर परिसरात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात विठू नामाचा गजर केला. भजने गात, रिंगण सोहळा मोठया उत्साहात पार पडला.

हनुमान मंदिर परिसरातील रिंगण सोहळा पार पडल्यानंतर ज्ञानोबा-तुकारामांच्या गजरात दिंडी सोहळा शहरातील विठ्ठल रूख्मिणी मंदिरात पोहचला. विठ्ठल मंदिर परिसरात डॉ. संगिता गुणेश पारनेरकर यांनी दिंडीचे स्वागत केले. जीवनात अध्यात्माची जोड असेल तर जिद्द आणि चिकाटी असेल तर अशक्य काही नाही असे रामराव गाडेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

दिंडीमध्ये पालकही सहभागी झाले होते. संस्थेचे अध्यक्ष रामराव गाडेकर, सचिव मच्छिंद्र मते, खजिनदार काशिनाथ फंड, विश्वस्त रावसाहेब कासार, विकास दळवी, ऋषीकेश पवार, प्राचार्य विठ्ठल तुपे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहभाग नोंदविला.

### संस्कार केले तरच संस्कृती टिकेल !

**संस्कार केले तरच संस्कृती टिकेल, संस्कृती टिकली तरच राष्ट्र टिकेल. आपल्या महाराष्ट्राला संतांची महान परंपरा असून त्यांच्या आचार विचारांवर मार्गक्रमण केले तर आपण जीवनात निश्चित यशस्वी होऊ. पोदान लर्न स्कुलच्या वतीने आयोजित केलेला हा उपक्रम निश्चित कौतुकास्पद आहे.**

**डॉ. संगिता गुणेश पारनेरकर**

# वारकऱ्यांच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी वेधले लक्ष!

## जांभुळवाडी शाळेच्या बालवारकऱ्यांचा दिंडी सोहळा



**सुपा : प्रतिनिधी**

**देवशयनी आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला सुप्याच्या जांभुळवाडी जिल्हा परिषद शाळेतील चिमुल्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत काढलेल्या दिंडीने सुपेकरांचे लक्ष वेधून घेतले. या बालवारकऱ्यांनी सुप्यामध्येच पंढरी दाखविल्याच्या भावना ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केल्या.**

जांभुळवाडीची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुणवत्तेसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय डोळयापुढे ठेऊन कार्यरत आहे. आषाढी एकादशीचे औचित्य साधून महाराष्ट्राचा अध्यात्मिक व सांस्कृतीक वारसा जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दिंडीचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते. धार्मिक संदेशाबरोबरच प्रबोधनात्मक संदेशही या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला.

दिंडी सोहळा मार्गक्रमण करीत असताना जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांनी या अध्यात्मिक दिंडी सोहळयाचा आनंद घेतला. अतिशय उत्साही आणि भक्तीमय वातावरणात हा सोहळा पार पडला. शाळेच्या वतीने नाविण्यपुर्ण पध्दतीने काढलेल्या या दिंडी सोहळयाचे ग्रामस्थ तसेच पालकांनी कौतुक केले. अनेक पालक, ग्रामस्थांनी उस्फुर्तपणे या दिंडी सोहळयात सहभागी होत पांडूरंगाच्या जयघोषात तल्लीन होणे पसंत केले.

या दिंडी सोहळयाच्या नियोजनासाठी मुख्याध्यापिका कांता बनकर, सुवर्णा पवार, मीना चाकणे, मनिषा ताजवे यांनी पुढाकार घेत उत्कृष्ट उपक्रम पार पाडला.

### चिमुकल्यांच्या अल्पोपहारासाठी ग्रामस्थ सरसावले

**विठुरायाचा जयघोष करीत निघालेल्या या दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरेंद्र शिंदे यांनी अल्पोपहाराची, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जालिंदर टोणगे व रोहित थोरात यांनी केळी फळांची, कैलास पाचरे यांनी बिस्किटे-चॉकलेटची तर सुखदेव पवार यांनी बाटलीबंद पाण्याची व्यवस्था केली होती.**

### वृक्ष दिंडी, ग्रंथ दिंडीचे कौतुक

**जांभुळवाडी शाळेच्या १२५ विद्यार्थ्यांनी या दिंडीत सहभाग नोंदविला. खांद्यावर भगवी पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन, भाळी टीळा लावून, टाळ-मृदुंगाच्या निनादात पांडूरंगाचा जयघोष करणाऱ्या या दिंडीने अवघे सुपे गाव भक्तीरसात न्हाऊन निघाले. दिंडीमधील वृक्ष व ग्रंथदिंडीचे ग्रामस्थांनी कौतुक केले.**

# तालुका राष्ट्रवादीच्या वतीने आ. गर्जे यांचा सत्कार

## निष्ठेला न्याय दिल्याच्या भावना

**सुपा : प्रतिनिधी**

**नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य विधान परिषदेच्या निवडणूकीत विजयी झालेले राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार आ. शिवाजीराव गर्जे यांचा पारनेर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी सत्कार करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

यावेळी बोलताना विक्रमसिंह कळमकर म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी नगर जिल्हयाचे सुपूत्र असलेल्या शिवाजीराव गर्जे यांच्यासारख्या ज्येष्ठ, निष्ठावान कार्यकर्त्यास संधी देत त्यांच्या निष्ठेला न्याय दिला आहे. मुंबईमध्ये राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना नेहमीच आधार देणाऱ्या नेत्याला संधी दिल्याबद्दल कळमकर यांनी अजित पवार व पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना धन्यवाद दिले.



■ विधानपरीषदेचे सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल पारनेर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या वतीने शिवाजीराव गर्जे यांचा विक्रमसिंह कळमकर यांनी सत्कार केला.

विधानपरिषदेचा आमदार म्हणून विक्रमसिंह कळमकर व त्यांच्या सहकाऱ्यांना आपले नेहमीच सहकार्य राहिल अशी ग्वाही देतानाच विकास कामांसाठीही त्यांचा शब्द डावलला जाणार नाही अशी ग्वाही गर्जे यांनी यावेळी दिली.

# ड्रोनच्या घिरट्यांचा निघोजकरांना घोर!

## प्रशासनाने खुलासा करण्याची मागणी

**निघोज : संदीप इधाटे**

**निघोज आणि परिसरात ठराविक अंतराने रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेऱ्याच्या घिरटया वाढल्या असून ड्रोनच्या या घिरटयांनी निघोजकरांचा घोर वाढला आहे. प्रशासनाने ड्रोनच्या या संशयास्पद घिरटयांबाबत खुलासा करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.**

निघोज व परिसरात यापूर्वीही ड्रोनच्या घिरटया सुरू असताना मंगळवार दि.१६ रोजी रात्री १० ते पहाटे एक वाजण्याच्या सुमारास या परिसरात ड्रोन कॅमेरा घिरटया घालत होता. मंत्री राधाकृष्ण विखे, खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधिक्षकांकडे त्याबाबत विचारणा करून जनतेमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण दुर करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मंगळवारी निघोज, गाडीलगांव, गुणोरे, देवीभोयरे, वडगांव गुंड, मोरवाडी, भांबरेमळा, रसाळवाडी, ढवणवाडी, वडनेर या परिसरात रात्री १० ते पहाटे १ वाजेपर्यंत ड्रोनच्या घिरटया सुरू होत्या अशी तक्रार ग्रामस्थ करत आहेत. शेजारील पुणे जिल्हयातील वडनेर खुर्द, टाकळी हाजी, माळवाडी, भाकरेवाडी या परिसरातही गेल्या अनेक दिवसांपासून ड्रोनचा हा प्रताप सुरू असल्याचे तेथील ग्रामस्थ सांगतात. याबाबत पोलीस तसेच महसूल प्रशासनास कळवूनही काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.



### पुणे जिल्हयात ड्रोनगणचा वापर ?

**ड्रोनच्या घिरटयांबाबत विधानसभेतही प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र त्यावर काही ठोस उत्तर मिळू शकले नव्हते. पुणे जिल्हयात या ड्रोनवर कारवाईसाठी सहकार मंत्री दिलीप वळसे यांनी ड्रोनगनचा वापर करण्याचा सुतोवाच केल्याची चर्चा आहे. पुणे जिल्हयाप्रमाणेच नगर जिल्हयातील पारनेर, श्रीगोंदे तालुक्याच्या काही भागात ड्रोन संशयास्पदरित्या घिरटया घालत असून त्यावरही कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.**

# लाडकी बहिण योजनेसाठी ५० टक्क्यांहून अधिक महिलांची नोंदणी

## लाडकी बहिण योजनेसाठी पंचायत समिती प्रशासन सरसावले

**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी पंचायत समिती प्रशासन सरसावले असून उद्दीष्टांपैकी ५० टक्क्यांहून अधिक महिलांचे अर्ज दाखल करण्यात आले.**

**गटविकास अधिकारी दयानंद पवार यांनी सांगितले की, या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाच्या वतीने विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यात ५६८ नारी ॲपद्वारे ऑनलाईन व ऑफलाईन अर्जांची नोंदणी करण्यात आली.**

गटविकास अधिकारी पवार म्हणाले, महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी या योजनेमुळे मदत होणार आहे. या योजनेचे अर्ज नोंदणी करण्यासाठी ठिकठिकाणी मदत केंद्र सुरू करण्यात आले. त्यास महिलांचा प्रतिसाद लाभला. कुटूंबातील महिलांची निर्णायक भुमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असल्याचेही पवार यांनी सांगितले.



नवविवाहीत महिलांच्या बाबतीत तिचे नाव रेशकार्डवर नसेल तर विवाह प्रमाणपत्र असलेल्या महिलेच्या पतीचे रेशनकार्ड हे उत्पन्नाचा दाखला म्हणून गृहीत धरण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोष्ट ऑफीसमधील बँक खाते ग्राहय धरण्यात येणार आहे असे पवार म्हणाले.

या दिवसीय मोहिमेसाठी पर्यवेक्षिका, महिला व बालकल्याण अधिकारी, शाखा अभियंता, सहाय्यक स्थापत्य अभियंता, विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी आदी २४ अधिकारी, कर्मचाऱ्यांकडे विविध ग्रामपंचायतींची जबाबदारी सोपविण्यात येऊन ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, बचतगट, आरोग्य विभागाचे कर्मचारी केंद्र चालक यांची मदत घेऊन या योजनेची व्यापक अंमलबजावणी करण्यात आली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com